F/c

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्र. १९६७, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी क्र:०२२-६८५९७४८६, ई-मेल :desk18@dtemaharashtra.gov.inवेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**तात्काळ -स्पीड पोस्ट /ई-मेलद्वारे**

क्रमांक : १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२१/७५४
दिनांक : १९ /०४ /२०२१

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता महाडीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या कार्यवाहीबाबत....( मुदतवाढ)

संदर्भ :- १) या कार्यालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/२०२०-२१/२०२०/३७७ दि. ०३ /१२/२०२०
२) या कार्यालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/२०२०-२१/विकाप/२०२१/१३ दि. १३ /०१/२०२१
३) या कार्यालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/२०२०-२१/विकाप/२०२१/४६ दि. ११ /०२/२०२१
४) या कार्यालयामार्फत डीबीटी पोर्टलवरील योजनांबाबत घेतलेली V.C.बैठक दि. १२ /०२/२०२१
५) या कार्यालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/व्ही.सी./२०२१/५९ दि. २४ /०२/२०२१
६) या कार्यालयाचे अ.शा.पत्र क्रमांक : १८/तंशिसं/डीबीटी/२०२१/ ६४ दि. ०१/०३/२०२१
७) सामान्य प्रशासन विभाग (मा.तं.) यांचे पत्र क्र.डीबीटी २०१८/प्र.क्र.४७/से-१/३९ दि.०१/०३/२०२१
८) या कार्यालयाचे अ.शा.पत्र क्रमांक : १८/तंशिसं/डीबीटी/२०२१/ ७८ दि. ०४/०३/२०२१
९) या कार्यालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/व्ही.सी./२०२१/५९ दि. २४ /०२/२०२१
१०) या कार्यालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/व्ही.सी./२०२१/१४३ दि. ०६ /०४/२०२१

उपरोक्त १ ते ६ व ९,१० च्या संदर्भीय पत्रान्वये, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता महाडीबीटी पोर्टलवर तंत्रशिक्षण संचालनालयाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत सर्व विभागीय कार्यालयांमार्फत त्यांच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व संस्थांना, महाडीबीटी पोर्टलवरील योजनांच्या लाभासाठी त्वरीत, पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज भरून घेण्याबाबत तसेच संस्थांनी त्यांच्या लॉगीनमध्ये व विभागीय कार्यालयांनी त्यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त होणारे योजनांचे अर्ज प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या अटी व शर्तीनुसार तपासणी ( मंजूर / नामंजूर ) करुन ताबडतोब निकाली काढण्याबाबत वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे.

सोबत जोडलेल्या स्क्रीनशॉटनुसार, महाडीबीटी पोर्टलवर सन २०२०-२१ करिता विद्यार्थ्यांना अर्ज भरुन अंतिम करण्यासाठी **दि. ३० /०४ / २०२१ पर्यंत** मुदतवाढ देण्यात जाहीर करण्यात आलेली आहे.

सर्व विभागीय कार्यालयांनी त्यांच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व संस्थांना असे सूचित करावे की, डीबीटी पोर्टलवर सन २०२०-२१ करिता, तंत्रशिक्षण संचालनालयाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या लाभासाठी त्वरीत, पात्र विद्यार्थ्यांकडून दिलेल्या मुदतीत अर्ज भरून घ्यावेत व संस्थांनी त्यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त होणारे योजनांचे अर्ज प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या अटी व शर्तीनुसार तपासणी ( मंजूर / नामंजूर ) करुन मुदतीपुर्वी पुढील कार्यवाहीसाठी पाठवावे. जर पात्र विद्यार्थी योजनेचा अर्ज भरण्यापासून वंचित राहिल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी. तसेच जर संबंधित योजनांच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीची पूर्तता करत नसतानाही विद्यार्थ्यांचा अर्ज संस्थेकडून मंजूर करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्यास याबाबत संस्था प्राचार्यांवर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तसेच, विभागीय कार्यालयांनीदेखील त्यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त होणारे योजनांचे अर्ज प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या अटी व शर्तीनुसार तपासणी ( मंजूर / नामंजूर ) करुन मुदतीपूर्वी निकाली काढावे जेणेकरुन पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही.

(डॉ. अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण,म.रा.मुंबई.



पृष्ठांकन पत्र जा.क्र. : विकाऔ/शिक्षण/२०२१/ 1082    दिनांक : 19-04-2021

प्रति,
**प्राचार्य,** सर्व शासकीय अनुदानित/विनाअनुदानित पदवीका/पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायीक अभ्यासक्रमांच्या संस्था औरंगाबाद विभाग यांना देऊन कळविण्यात येते की, वरील विषयी संदर्भिय पत्राचे अवलोकन करुन शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता महाडीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या योजनांच्या कार्यवाहीबाबत दिलेल्या निर्देशेप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत ची नोंद घ्यावी.
सोबत : वरीलप्रमाणे.

**(महेश शिवणकर)**
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय औरंगाबाद